RNI No. MAHBIL/2009/35526

# महाराष्ट्र शासन राजपत्र

## भाग चार-क

वर्ष ५, अंक ३४] गुरुवार ते बुधवार, ऑक्टोबर १७-२३, २०१९/आश्विन २५-कार्तिक १, शके १९४१ [पृष्ठे ३
[ किंमत : रुपये ६.०० ]

### प्राधिकृत प्रकाशन

**महाराष्ट्र शासनाव्यतिरिक्त इतर वैधानिक प्राधिकाऱ्यांनी तयार केलेले (भाग एक, एक-अ व एक-ल यांमध्ये प्रसिद्ध केलेले वैधानिक नियम व आदेश यांव्यतिरिक्त इतर) वैधानिक नियम व आदेश ; यात भारत सरकार, उच्च न्यायालय, पोलीस आयुक्त, आयुक्त (राज्य उत्पादन शुल्क), जिल्हादंडाधिकारी व निवडणूक आयोग, निवडणूक न्यायाधिकरण, निवडणूक निर्णय अधिकारी व निवडणूक आयोगाखालील इतर प्राधिकारी यांनी तयार केलेले वैधानिक नियम व आदेश यांचा समावेश होतो.**

### पोलीस आयुक्त, बृहन्मुंबई

**अधिसूचना**

**सिनेमा व्यतिरिक्त सार्वजनिक मनोरंजनाच्या जागांसाठी आणि कॅब्रेनृत्याचे कार्यक्रम, डिस्कोथेक खेळ, पुल/स्नुकर खेळ पार्लर, मनोरंजनाचे संगणक खेळ, वास्तवभासी खेळ, सायबर कॅफेए, नेट कनेक्टीव्हीटी खेळ, बॉलींग ॲली, कार्ड रूम्स्, सोशल क्लब, स्पोर्टस् क्लब, मेळा आणि तमाशा यांसहित सार्वजनिक मनोरंजनाच्या कार्यक्रमांसाठी परवाना देणे व त्यावर नियंत्रण ठेवणे याबाबत नियम, १९६०.**

क्रमांक १०४२/सीपी/कक्ष-१०(एचबी)/एनएनजी/अधिसूचना/२०१९.—पोलीस आयुक्त, बृहन्मुंबई यांनी शासन पत्र क्रमांक. संकिर्ण–०३१७/प्र.क्र.५६/विशा–५, गृह विभाग, मंत्रालय मुंबई, दिनांक १० एप्रिल २०१७ अन्वये महाराष्ट्र शासनाच्या पूर्व मंजुरीसह महाराष्ट्र पोलीस अधिनियम, १९५१ (१९५१ चा महाराष्ट्र पोलीस अधिनियम, २२) याचे कलम ३३ पोटकलम (१) चे खंड (डब्ल्यू), (डब्ल्यूए), (एक्स), (वाय) याद्वारे प्रदान करण्यात आलेल्या अधिकारांचा वापर करून सुधारित फी वाढ/नियम करण्याचे प्रस्तावित केले होते. यामुळे ज्यांच्यावर परिणाम होण्याचा संभव असेल अशा सर्व व्यक्तींच्या माहितीसाठी उक्त कलम ३३ च्या पोटकलम (६) अन्वये सदरची अधिसूचना **राजपत्रात** प्रसिद्ध झाल्यापासून ३० दिवसांच्या समाप्तीनंतर अंमलात येईल.

**राजपत्रात** सदरहू अधिसूचना प्रसिद्ध झालेल्या दिनांकापासून ३० दिवसांच्या आत पोलीस आयुक्त, कक्ष–१० (हॉटेल शाखा), डी.एन.रोड, मुंबई ४०० ००१ या कार्यालयास कोणत्याही व्यक्तींकडून हरकती अथवा सूचना प्राप्त झाल्यास त्या विचारात घेण्यात येतील.

**मुख्य नियमातील नियम क्रमांक २१३ मध्ये बदल :**

मुख्य नियमातील नियम क्रमांक २१३ मधील खंड (अ) मधील विद्यमान तक्त्यानंतर पुढीलप्रमाणे मजकूर दाखल करण्यात येईल :—

ऑर्केस्ट्रा जागेच्या परवान्याची फी रुपये २,००,००० आकारण्यात येईल.

**टिप.—** प्रस्तावित शुल्कवाढीमध्ये प्रतिवर्ष १० टक्के इतके नुतनीकरण शुल्कवाढ करण्यात येईल.

**संजय बर्वे,**
पोलीस आयुक्त, बृहन्मुंबई.

## COMMISSIONER OF POLICE, BRIHAN MUMBAI

*NOTIFICATION*

Rules For Licensing And Controlling Places of Public Amusements (Other Than Cinemas) And Performances For Public Amusement, Including Cabaret Performances, Discotheque, Games, Pool Game Parlours, Amusement Parlours Providing Computer Games, Virtual Reality Games, Cyber Cafes, Games With Net Connectivity, Bowling Alleys, Card Rooms, Social Clubs, Sports Clubs, Melas And Tamashas Rules, 1960.

No. 1042/CP/Desk-10(HB)/NNG/Notification/2019.— The Commissioner of Police, Brihan Mumbai, proposes to make following draft rules with the previous sanction of the State Government *vide* letter No. MIS.0317/P.N.,56/Visha-5/Home Department, Mantralaya, Mumbai, Dated 10th April 2017, under clauses (W), (w-a), (x), (y) of sub-section *(1)* of section 33 of Maharashtra Police Act, 1951 (Bom. XXII of 1951), is hereby published as required by sub-section *(6)* of the said section 33 for information of all persons likely to be affected thereby, and notice is hereby given that the said draft will be taken into consideration by the Commissioner of Police, Brihan Mumbai, after the expiry of thirty days from the date of its publication in the *Official Gazette.*

Any objection or suggestions, which may be received by the Commissioner of Police, Desk-X (Hotel Branch), D.N. Road, Mumbai 400 001 from any person with respect to said before the expiry of the period aforesaid will be considered by him.

Amended rules—

*In Rule 213 of the Principal Rules* :—

In Rule 213 of the Principal Rules, after the exisiting table of clause (a) the following lines will be inserted :—

The Licence fee for the Orchestra Premises will be charged as Rs. 2,00,000/—.

Note.— Enhancement will be made in the renewal fees at the rate of 10% per annum.

SANJAY BARVE,
Commissioner of Police,
Brihan Mumbai.

ON BEHALF OF GOVERNMENT PRINTING, STATIONERY AND PUBLICATION, PRINTED AND PUBLISHED BY DIRECTOR DR. NAMDEO KONDAJI BHOSALE, PRINTED AT GOVERNMENT CENTRAL PRESS, 21-A, NETAJI SUBHASH ROAD, CHARNI ROAD, MUMBAI 400 004 AND PUBLISHED AT DIRECTORATE OF GOVERNMENT PRINTING, STATIONERY AND PUBLICATIONS, 21-A, NETAJI SUBHASH ROAD, CHARNI ROAD, MUMBAI 400 004 EDITOR : DIRECTOR DR. NAMDEO KONDAJI BHOSALE.